2(2)

व्यवस्थापन परिषदेची दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
| --- | --- | --- |
| बाब १. | दिनांक ६ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक ६ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या सभेच्या इतिवृत्तास खालील सुधारणांसह मान्यता देण्यात आली.<br><br>१. पृष्ठ क्रमांक ३, बाब क्रमांक ३ येथील शेवटची ओळ "मात्र बाब क्रमांक ९ मधील मुंबई विद्यापीठाच्या वतीने के.सी. महाविद्यालयाला देण्यात येत असलेले रूपये २,००,०००/- कोणकोणत्या स्पर्धासाठी व कशा रीतीने खर्च केले याबाबतची माहिती सभागृहास संचालक, क्रिडा, मुंबई विद्यापीठ यांनी सादर करावी असे ठरले."<br><br>च्या ऐवजी असे वाचावे<br><br>"सदर बाब क्रमांक ९ मधील मुंबई विद्यापीठाच्या वतीने के.सी. महाविद्यालयाला देण्यात येत असलेले रूपये २,००,०००/- मान्य करण्यात आले, तथापि सदरबाबत सविस्तर माहिती सभागृहास संचालक, क्रिडा, मुंबई विद्यापीठ यांच्याकडून सादर करण्यास सांगण्यात आले."<br><br>२. पृष्ठ क्रमांक ७, बाब क्रमांक ४ येथील वाक्य "सदरहु प्रस्तावाबाबत चर्चेअंती असे ठरले की वर्ष २०१८-२०१९ च्या विद्यार्थ्यांना जी फेलोशिप मिळत होती ती त्यांना विद्यापीठाच्या फंडातून दयावी व सन २०१९-२०२० च्या विद्यार्थ्यांना नॉननेट/सेट फेलोशिप देण्यात येऊ नये व पुढील शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून संशोधन व फेलोशिप याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरविण्यासाठी डॉ. बी.एन. जगताप यांची समिती गठीत करण्यात आली व इतर समिती सदस्य गठीत करण्याबाबत मा. कुलगुरूंना अधिकार प्रदान करण्यात आले." | |

| | | |
|---|---|---|
| | च्या ऐवजी असे वाचावे<br><br>"सदरहु प्रस्तावाबाबत चर्चेअंती असे ठरले की वर्ष २०१८-२०१९ च्या विद्यार्थ्यांना जी फेलोशिप मिळत होती ती त्यांना त्यांची पात्रता व निकष तपासून विद्यापीठाच्या फंडातून दयावी व इथुन पुढे विद्यार्थ्यांना नॉननेट/सेट फेलोशिप देण्यात येऊ नये व पुढील शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ पासून संशोधन व याबाबत मार्गदर्शक तत्वे ठरविण्यासाठी डॉ. बी. एन. जगताप यांची समिती गठीत करण्यात आली. इतर सदस्य नेमणुकीचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले." | |
| कार्यकारी प्राधिकरणे विभागाने केलेली कार्यवाही | सुधारित ठराव पत्र क्र. काप्रावि/आयसीडी/२०२०-२१/९४ दिनांक २ डिसेंबर, २०२० अन्वये वित्त व लेखा विभागास पाठविण्यात आले. | |
| बाब २. | **To include for Dr. Babasaheb Ambedkar International Research Centre in Master plan of Kalina Campus, University of Mumbai.** | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |
| ठराव | मा. प्र-कुलगुरूंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठामध्ये स्थापन करण्याबाबत सभागृहास सविस्तर माहिती दिली. त्या अनुषंगाने असा ठराव करण्यात आला की डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र मुंबई विद्यापीठामध्ये स्थापन करावे.<br><br>डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रासाठी चार पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी विद्यापरिषदेची मान्यता घेतलेली आहे. यामुळे सदर संशोधन केंद्राचे काम मोठया प्रमाणात सुरु होणार आहे. यादृष्टीने केंद्राला स्वतंत्र जागा असणे आवश्यक असल्याने विद्यानगरी परिसराच्या मास्टर प्लॅनमध्ये सदर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राचा अंर्तभाव करण्यात यावा. सदर ठरावास प्रा. अजय भामरे व श्री. प्रदिप सावंत यांनी अनुमोदन दिले व एकमताने ठराव मान्य करण्यात आला.<br>सदर ठराव याच सभेमध्ये मंजुर करण्यात आला. | |
| विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने केलेली कार्यवाही | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्र या इमारतीचे, बांधकाम मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरामध्ये नॅनो टेक्नोलॉजी इमारती शेजारील जागेत | |

| | | |
|---|---|---|
| | करणेचे प्रस्तावित आहे.<br><br>सदर जागेचा कोनशिला समारंभ दि. ०६ डिसेंबर, २०२० रोजी संपन्न झाला. सदर इमारतीची बृहत आराखडयामध्ये तरतूद करणेचे अनुषंगाने एम.एम.आर. डी.ए. यांना २१/१२/२०२० रोजीचे पत्रान्वये कळविले आहे, असे विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने पत्र क्र. Engg/ICD/2020-21/1361 दिनांक २४ मार्च, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब ३. | **शासन निर्णय क्र. शानिवा-२५१७/प्र.क्र.३३/२३-अ, दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ अन्वये शासकीय निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतर अधिक वास्तव्य करण्याबद्दल दंडनीय दराने प्रती चौरस फूट रु.१५०/- अनुज्ञप्ती शुल्क आकारण्याबाबतची बाब.:- पुन:श्च सादर** | प्रशासन विभाग, आंबेडकर भवन |
| ठराव | सदर बाब दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये मंजुर झाली होती. मात्र सदर दंड लागू करणेबाबतचा कालावधी स्पष्ट करण्यात आलेला नसल्याने सदर बाब पुन:श्च चर्चेला आल्याचे कुलसचिवांनी सभागृहास सांगितले. त्यानुसार असा ठराव करण्यात आला की, शासन निर्णय दिनांक ३० ऑगस्ट, २०१८ रोजीचा असल्याने त्या दिवसापासून दंड आकारणी करण्यात यावी.<br><br>तसेच आज रोजी सेवानिवृत्त झालेले व अदयापी शासकीय निवासस्थानात राहत असलेले असे किती शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी आहेत त्यांची यादी, त्यांना किती नोटीसा दिल्या आहेत, यानुसार त्यांना किती दंड लागू होत आहे, सद्यपरिस्थिती, इत्यादी बाबतची सविस्तर माहिती सामान्य प्रशासन विभागाने पुढच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये सादर करावी, तसेच ज्या प्रकरणी आवश्यकता आहे त्या प्रकरणात कायदेशीर सल्ला घेऊन कारवाई करण्याची प्रक्रिया तात्काळ करावी, असे कुलसचिवांना निर्देश दिले. | |
| प्रशासन विभाग आंबेडकर भवनने केलेली कार्यवाही | कलिना सामान्य प्रशासन विभागाने विद्यापीठाच्या निवासस्थानात राहत असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांनी किती दंड भरावा व त्यांना किती नोटीसा पाठविल्या आहेत, याबाबतची माहिती पत्र क्र. वि / वि / ५४ / ४१/२०२१ दिनांक ७ जानेवारी, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |

| आयत्यावेळी आलेली बाब | | |
|---|---|---|
| बाब ४. | पारसी कॉलनी येथील विद्यापीठाच्या सदनिकेचा मालमत्ता कर २१ दिवसांत भरणेबाबतची नोटीस ई-मेलद्वारे विद्यापीठास दि. २४ नोव्हेंबर, २०२० रोजी आल्याचे कुलसचिवांनी सभागृहास सांगितले. तसेच हे ही नमूद केले की, सदर सदनिकेचा ताबा अदयापपर्यंत विद्यापीठाने घेतलेला नाही व याबाबत निर्णय घेण्यासाठी बाब तातडीने व्यवस्थापन परिषदेपुढे मांडण्यात येत आहे.<br><br>याबाबत ॲड नील हेळेकर यांनी सभागृहास सविस्तर माहिती दिली की, या प्रकरणी समिती गठीत करण्यात आली होती, त्यांच्या बैठकाही झाल्या आहेत, कायदेशीर सल्लाही घेण्यात आला आहे. मात्र समितीचा अंतिम अहवाल अदयापपर्यंत न आल्याने याबाबत निर्णय व कार्यवाही झालेली नाही.<br><br>सर्व सदस्यांनी यावर तीव्र मते, नाराजी व्यक्त केली व त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे एकमताने ठराव करण्यात आला.<br><br>"पारसी कॉलनीची सदनिका ताब्यात घेण्याबाबत गठीत करण्यात आलेली समिती व अशा इतर समित्या जेथे समिती अध्यक्षांनी अदयापपर्यंत बैठका घेऊन अहवाल सादर केला नाही अथवा कोणतीही कार्यवाही केली नाही अशा सर्व समित्या बरखास्त कराव्यात असे मत श्री. रविकांत सांगुर्डे यांनी मांडले, त्यास श्री. प्रदिप सावंत, श्री. राजन कोळंबेकर आणि सर्व सदस्यांनी एकमताने अनुमोदन दिले. मा. कुलगुरूंना सदर समितीचे पुनर्गठन करण्याचे अधिकार देण्यात यावे असेही एकमताने मांडण्यात आले. त्यानुसार असा ठराव करण्यात आला की, आजपर्यंत तीन महिन्याहून अधिक कालावधी लोटलेल्या ज्या समितींचे अहवाल सादर झालेले नाहीत अशा सर्व समित्या बरखास्त करून पुनर्गठन करण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरूंना देण्यात आलेत. पारित केलेल्या या ठरावाच्या अनुषंगाने मा. कुलगुरूंनी आजपर्यंत किती समित्या कोणकोणत्या विषयासाठी गठीत झालेल्या आहेत त्यांची नावासहीत यादी, किती समित्यांनी अहवाल सादर केले आहेत, इत्यादी बाबतची सविस्तर माहिती त्वरेने देण्याचे निर्देश कुलसचिवांना दिले.<br><br>यापुढे पारसी कॉलनीची सदनिका ताब्यात घेण्यासंबंधी कायदेशीर कार्यवाही आणि संबंधितांशी पत्रव्यवहार (कुलसचिवांच्या मार्फत) करण्याचे सर्व | विद्यापीठ क्षेत्र विकास विभाग |

| | | |
|---|---|---|
| | अधिकार ॲड. विजय वैदय यांना देण्यात आले व त्यानुसार त्यांनी या सदनिकेचा ताबा घेणेबाबत आणि मालमत्ता कर भरणेबाबत अंतिम तारखेच्या आत त्वरेने पुढील कार्यवाही करावी असे ठरले. तसेच सेंट्रल बँकेशी चर्चा/पत्रव्यवहार करून श्रीमती पंतवैदय यांनी त्यांच्या मृत्युपत्रात विद्यापीठाच्या नावे नमुद केलेली जंगम मालमत्ता ही ताब्यात घ्यावी.<br><br>तसेच विद्यापीठाचे शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई येथील गोडाऊनबाबतही ॲड. विजय वैद्य यांची नेमणूक करून त्यांनी लवकरात लवकर कुलसचिवांबरोबर कार्यवाही करावी."<br><br>सदर ठराव याच सभेमध्ये मंजूर करण्यात आला. | |
| विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने केलेली कार्यवाही | ॲड वैद्य यांचे सल्ल्यानुसार महानगरपालिकेचा मालमत्ता कर भरणा केला असून, दि. २४/०२/२०२१ रोजी सदनिकाचा ताबा घेण्याच्या अनुषंगाने रजिस्ट्रेशन ऑफिसमध्ये नोंदणी देखील झाली आहे. सदर सदनिकेचा ताबा डेव्हलपर्सकडून त्याच दिवशी घेण्यात आला आहे.<br>ॲड वैद्य यांचे सल्ल्याने डिपॉझिट, ज्वेलरी, शेअर्सबाबत सेंट्रल बँकेसोबत पत्रव्यवहार सुरू आहे. शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई गोडाऊन बाबतचे कागदपत्रे ॲड वैद्य यांना पाहणीकरता देण्यात आली आहेत, असे विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने पत्र क्र. Engg/ICD/2020-21/1361 दिनांक २४ मार्च, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |

डॉ. बळीराम गायकवाड
कुलसचिव (प्र.)
(मुंबई विद्यापीठ)

मुंबई – ४०० ०३२
८ एप्रिल, २०२१